**दि.कि.अर्ज क्रं.२१४/२०२५**
**नि.क्रं.३०**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रं.०३ यांचा पुरावा</u>**

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव - अनुज पुंडलीक फराकटे,

वय - २५ वर्षे, व्यवसाय - नोकरी,

राहणार - श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर

**<u>सरतपास अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.बी.एन. रणसिंग</u> -**

**०१.** मी स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेच्या श्रीगोंदा शाखेत जुलै २०२५ पासून ज्युनिअर असोसिएट म्हणून कार्यरत आहे. मला साक्षीसमन्स मिळाले, त्याप्रमाणे मी कागदपत्र घेऊन आलो आहे. मी ते सर्व कागदपत्र या दाव्यात दाखल केलेले आहेत. मला आता अधिकारपत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर बँक मॅनेजरची सही आहे तसेच माझी सही आहे. बँकेचा शिक्का आहे. ते अधिकारपत्र **निशाणी क्रं.३१** वर आहे. मी दि.१२.०६.२०२३ ते १५.०१.२०२६ या कालावधीचा राजाराम हरिभाऊ शिंदे यांच्या बचत खात्याचा उतारा दाखल केला. त्या उताऱ्यासोबत मी भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम ६५ब प्रमाणे प्रमाणपत्र दाखल केले आहे. मला आता बचत खात्याचा उतारा व वर नमूद प्रमाणपत्र दाखविण्यात आले ते तेच आहे. त्या उताऱ्यातील नोंदी खऱ्या आहेत. त्यावर मॅनेजर यांची सही आहे व बँकेचा शिक्का आहे. मी त्यांची सही ओळखतो. प्रमाणपत्रातील मजकूर बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. तो खाते उतारा व प्रमाणपत्र **निशाणी क्रं.३२ व ३३** वर आहे.

**<u>उलटतपास सामनेवालातर्फे</u> -**

**सामनेवालातर्फे कोणी नाही म्हणून उलटतपास नाही.**

**फेर-तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-
(प्रतिभा अ. पाटील)
०५ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
अहमदनगर.
J.O. Code No.MH01831

दिनांक : १७.०१.२०२६
पौष कृष्णपक्ष चर्तुदर्शी शके १९४७